# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १९६-२२ दिनांक :- ३०/०६/२०२२

## चारचाकी वाहन चोरी करणाऱ्या आरोपीतांना मुद्देमालासह अटक - माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

दिनांक २३/०६/२०२२ रोजी तक्रारदार नामे श्री. दिनेश काशमभाई पटेल, वय ४९ वर्षे यांची मारुती सुझुकी इको कार अंदाजे किं. रु. १,५०,०००/- चोरी झाल्याने त्यांनी माणिकपुर पोलीस ठाणे येथे येवुन तक्रार दिली असता गु.र.क्र. २२६/२०२२ कलम ३७९ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकाने सलग ६ दिवस तांत्रीक विश्लेषन करुन तसेच गुप्त बातमीच्या आधारे सापळा रचुन गोखीवरे परीसरातुन आरोपी नामे सुनिल चार्लस वाघमारे, वय २३ वर्षे, रा. साईबाबा मंदिराजवळ, देवीपाडा, गोखिवरे, वसई पुर्व, जि. पालघर यास ताब्यात घेवुन त्याच्याकडुन वर नमुद गुन्हयातील चोरी केलेली इको कार हस्तगत केली आहे. तसेच त्याचा साथीदार नामे रामजीत नरेश भारती, वय २३ वर्षे, रा. पाठक चाळ, शंकर मंदिराजवळ, कुंभारपाडा, विरार पुर्व, जि. पालघर यास टाकी रोड, नालासोपारा पुर्व परीसरातुन गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या मोटार सायकलसह ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०२, श्री. प्रदीप गिरीधर, सहायक पोलीस आयुक्त, वसई , श्री. संपतराव पाटिल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,माणीकपुर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटिल, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी व पो.शि. प्रविण कांदे यांनी केलेली आहे.

------------ooooooo----------------